वाचले:-

1. ज्योती इंग्लिश स्कूल, [illegible] /8/80 वर्गास मान्यता मिळणे बाबतचे पत्र.
2. तपासणी अधिकारी, यांनी शाळा तपासणीचा केलेला दिनांक 8/5/81 चा अहवाल.
3. प्राथमिक शिक्षण नियमावली 1949 मधील नियम 107 प्रमाणेच्या तरतुदी.
4. शिक्षण मंडळ सभा दिनांक 11/5/81 चे मंजुर ठरावान्वये.

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

शिक्षण मंडळ कार्यालय
पिंपरी चिंचवड नगर पालिका पुणे १८
क्र.शिक्षण/२/३०३/८१-८
दिनांक १७/५/८१

विषय:- खाजगी शाळाचे वर्गाचे मान्यते बाबत.

आदेश,

न.पा. परिसरातील नेहरूनगर येथील खाजगी शाळेने त्यांचेकडील इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंतच्या वर्गांना मान्यतेकामी दिनांक 18/8/80 रोजी दिलेल्या अर्जाची चौकशी करून तपासणी अधिकारी, यांचेकडील दिनांक 8/5/81 रोजी केलेल्या तपासणी अहवालानुसार व शिक्षण मंडळाचे दिनांक 11/5/81 चे सभेतील मंजूर ठरावानुसार आपले शाळेच्या वर्गांस खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

अटी:-

1. वर्गातील विद्यार्थी संख्येनुसार प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमावा,
2. वर्गामध्ये विद्यार्थ्यांना बसण्यास नियमानुसार पुरेशी [नियम क्रं. 122] जागा ठेवावी.
3. मैदान आरोग्य सेवा, फर्निचर, शालेय साहित्य, पुरेशा प्रमाणांत पुरवावे.
4. प्रशिक्षित शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणीनुसार पगार व अन्य देय भत्ते देणेसाठी अगाऊ आर्थिक तरतूद केलेली असावी.
5. पगार बीले, व शालेय हिशोबाबाबत स्वतंत्र रेकॉर्ड ठेवावे.
6. शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे, नियमाप्रमाणे भविष्य निर्वाह निधी, सेवानिवृत्ती वेतन इत्यादी कामी सेवा नियम लागू करावेत. शालेय सुट्टया व कामाचे दिवस मान्य शाळेप्रमाणे ठेवावेत.

तथापि शाळेच्या फेर तपासणीत वरील बाबींपैकी जर त्रुटी अथवा दोष दिसून आल्यास दिलेली मान्यता काढून घेतली जाईल.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी, पुणे १८.

[illegible] प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ पिं. चिं. न. पालिका
पुणे १८ [illegible]

TRUE COPY

HEAD MISTRESS
Jyoti English School,
[illegible]